# पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- २०२५

## प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्धीची

## -- जाहीर सूचना --

मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५ दि.१३.११.२०२५ च्या सुधारीत वेळापत्रकानुसार पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस आस्तित्वात असलेल्या पनवेल विधानसभेच्या मतदार यादीवरून महानगरपालिकाच्या सार्वत्रिक निवडणूकीकरीता तयार केलेली प्रारूप मतदार यादी हरकती व सूचना मागवण्यासाठी दि.२०.११.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

मा. राज्य निवडणूक आयोगाच्या पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५ दि.२६.११.२०२५ ने सुधारित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दि.०३.१२.२०२५ होता. सदर दिनांकापर्यंत प्राप्त हरकती व सूचनाबाबत योग्य ती कार्यवाही पूर्ण करून पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता प्रभाग क्र.१ ते २० च्या प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन मा. राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ०९/१२/२०२५ रोजीच्या सुधारीत कार्यक्रमानुसार नागरिकांच्या माहितीसाठी सोमवार दि.१५.१२.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येत असून सदरच्या अंतिम मतदार याद्या खालील नमूद ठिकाणी मतदाराच्या व नागरिकांच्या अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

१. पनवेल महानगरपालिका मुख्यालय(निवडणूक विभाग)
२. महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.panvelcorporation.com)
३. महानगरपलिकेची सर्व प्रभाग कार्यालय व उपविभाग नावडे.

जा.क्र :- पमपा/नि.वि/अं.म.या.प्र/२१२५/१८८/१०३ /२०२५
दिनांक :- १४/१२/२०२५

स्वाक्षरी/-
आयुक्त,
पनवेल महानगरपालिका